# विनिमय ३

## शेतकरी संस्थेचे सभासदत्व










BAIF

apmas

# सदस्यांचा सहभाग




३

# विनिमय

## शेतकरी संस्थेचे सभासदत्व

शेतकरी संस्थेच्या संचालकांसाठी
अभ्यास पुस्तिका संच



DGRV apmas BAIF

# विनिमय

## शेतकरी संस्थेचे सभासदत्व

**प्रथम आवृत्ती – मे २०२१**

**किंमत – रु.१००/–**

**पुनर्मुद्रणाचे हक्क राखीव आहेत.**

एपीएमएएसच्या परवानगीने आणि एपीएमएएस आणि डीजीआरव्ही लोगो वापरुन सामग्री पुन्हा मुद्रित केली जाऊ शकते.

पुस्तकांच्या मागणीसाठी आपण एपीएमएएस आणि बाएफच्या कार्यालयात फोन किंवा मेलद्वारे संपर्क साधू शकता.

**द्वाराप्रकाशित**

**महिला अभिवृद्धी सोसायटी (एपीएमएएस)**

प्लॉट क्र. ११ आणि १२, हुडा कॉलनी, तानेशानगर, माणिकोंडा
हैदराबाद – ५०००८९, तेलंगणा, भारत
कार्यालय – ०८४१३–४०३११८ / ०८४१३–४०३१२०
ई–मेल – info@apmas.org वेबसाईट – www.apmas.org

आणि

**बाएफ विकास अनुसंधान प्रतिष्ठान**

डॉ मणिभाई देसाई नगर, वारजे,
पुणे ४११०५८, महाराष्ट्र, भारत
कार्यालय – ०२०–२५२३१६६१
ई–मेल – baif@baif.org.in वेबसाईट – www.baif.org.in

# शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळासाठी स्वयंशिक्षण पुस्तिका संच कशासाठी?

भारतीय शेतकरी अनेक आव्हानांना तोंड देत असले, तरी गेल्या दशकात कृषी क्षेत्राला महत्वपूर्ण गती मिळाली आहे. शेतकऱ्यांना संघटित करणारी शेतकरी संस्था (एफपीओ), ही धोरणकर्त्यांनी आणि अभ्यासकांनी, शेतकरी समृद्धीसाठी सगळ्यात जास्त प्राधान्य दिलेली संस्थात्मक रचना म्हणून उदयास आली आहे. 'शेतकरी संस्था' हे पुढील पाच वर्षांत भारतातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नात दुप्पट करणारे अत्यंत महत्वाचा घटक ठरणारे धोरण आहे. भारतातील विविध संस्थांद्वारे जवळपास ५००० शेतकरी संस्थांना पाठबळ देण्यात आले आहे आणि बऱ्याच नवीन शेतकरी संस्था स्थापन केल्या जात आहेत. तेलगू भाषिक आंध्र प्रदेश आणि तेलंगणा राज्यात सुमारे ७०० शेतकरी संस्था आहेत. 'शेतकरी संस्था' चळवळ अजूनही प्राथमिक टप्प्यावर आहे, ज्यामध्ये शेतकरी संस्था संचालक मंडळ त्यांच्या प्रवर्तकांवर अवलंबून असते. संचालक मंडळाची स्वतःची दूरदृष्टी, व्यवसायाभिमुखता आणि क्षमता, मर्यादित असते कारण त्यांना दिले जाणारे प्रशिक्षण मर्यादित आहे. शेतकरी संस्थेसमोर बरीच आव्हाने आहेत जसे की, चांगल्या प्रशिक्षित आणि वचनबद्ध मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचा अभाव, सुशासन, व्यवसायाचे व्यवस्थापन, प्रभावी व्यवस्था, वित्त आणि बाजारपेठेतील प्रवेश या घटकांची आव्हाने, तर सरकारी योजनांविषयीची अपुरी माहिती यासारख्या अनेक गोष्टींनाही सामोरे जावे लागत आहे. कृषी मूल्य साखळी विकासावर लक्षणीय रितीने प्रभाव पाडण्याची क्षमता शेतकरी संस्थासाठी फारच दूरची बाब आहे.

शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळाची पात्रता आणि क्षमता वाढवणे हे शेतकरी संस्थेच्या यशासाठी अत्यंत, गरजेचे आहे ज्यायोगे शेतीपासून नफा वाढविण्यासाठी तसेच सदस्य शेतकऱ्यांना आवश्यक असणारी सेवा देणारी व्यावसायिक संस्था म्हणून त्या विकसित होऊ शकतील. शेतकरी संस्था अध्यापन केंद्राच्या माध्यमातून शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळाला सतत प्रशिक्षण व मार्गदर्शन देणे, एपीएमएएससाठी प्राधान्याची गोष्ट आहे, कारण आपण मोठ्या प्रमाणात शेतकरी संस्थांना पाठबळ देण्याचा प्रयत्न करीत आहोत आणि इतरांनी पाठबळ देवू केलेल्या शेतकरी संस्थांना मार्गदर्शन देत आहोत, ज्यायोगे योग्य कृषी मूल्य साखळी विकास उपक्रमांमध्ये त्या उपयुक्त ठरतील.

शेतकरी संस्थेवरील विद्यमान प्रशिक्षण पुस्तिका आणि अभ्यास संचांचा आढावा घेतल्यास, आम्हाला शेतकरी संस्था संचालक मंडळासाठी उच्च गुणवत्तेचे, व्यावहारिक आणि वापरासाठी सोपी स्वयंशिक्षण अभ्यास पुस्तिका नसण्याची मोठी उणीव आढळली. स्वयंसहायता संस्थांच्या स्वयंनियमन विषयावरील स्वयंशिक्षण अभ्यास पुस्तिका संच विकसित करण्याच्या आपल्या प्रचंड अनुभवावर आणि संस्था बांधकाम प्रशिक्षणातील १८ वर्षांच्या अनुभवाच्या आधारे श्री मधू मूर्ती आणि श्रीमती रामलक्ष्मी यांच्या नेतृत्वाखाली एपीएमएएस संघाच्या सहकार्याने एक वर्षाहून अधिक काळ काम करून, संसाधन संस्था, भागीदार

स्वयंसेवी संस्था, प्रशिक्षण संस्था आणि शेतकरी संस्थेचे प्रतिनिधी यांच्या साहाय्याने शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळासाठी १२ सुलभ वापर स्वयंअभ्यास पुस्तिका संच विकसित केला आहे. या संचामध्ये शेतकरी संस्थेची आवश्यकता आणि महत्त्व, संस्थात्मक रचना, सभासदत्व, नेतृत्व आणि शासन, व्यवस्थापन, नोंदणी आणि कायदेशीर अनुपालन, व्यवसाय नियोजन, उत्पादकता वर्धन, सामूहिक खरेदी विक्री (निविष्ठा आणि उत्पादन), शेती विषयक सेवा केंद्रांचे व्यवस्थापन, लेखा आणि वित्तीय व्यवस्थापन इत्यादींचा अंतर्भाव आहे.

शेतकरी संस्था ह्या नेहमीच लोकशाही पद्धतीने चालणाऱ्या स्वायत्त व्यावसायिक संस्था असतात. शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळाची आणि पदाधिकाऱ्यांची क्षमता वाढवण्याची सतत आवश्यकता असते कारण नियमित निवडणुकीमुळे त्याच्यात बदल होत असतो. आम्हाला खात्री आहे की हे वापरण्यास सुलभ असे स्वयंशिक्षण अभ्यास पुस्तिका संच शेतकरी संस्थांना त्यांच्या सदस्यांसाठी व्यवहार्य संस्था बनविण्यासाठी सक्षम करतील. स्वयंशिक्षण अभ्यास पुस्तिका संच शिकण्यासाठी शेतकरी संस्थेच्या प्रवर्तकांना पद्धतशीरपणे शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळाचे प्रशिक्षण घ्यावे लागेल. शेतकरी संस्थेचे प्रवर्तक आणि इतर भागधारक यांच्यासाठीही शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळाच्या स्वयंशिक्षण अभ्यास पुस्तिका संचाचा प्रभावीपणे वापर करता येईल ज्यायोगे शेतकरी संस्थेच्या स्वयं–व्यवस्थापित आणि व्यवहार्य व्यवसाय संस्था होण्यासाठी सक्षम बनतील. एपीएमएएसने तेलगू आणि इंग्रजीमध्ये या स्वयंशिक्षण अभ्यास पुस्तिका संच तयार करण्याची जबाबदारी स्वीकारली आहे, परंतु आवश्यकतेप्रमाणे या स्वयंशिक्षण अभ्यास पुस्तिका संचांचे संसाधन संस्था, राज्य सरकारे, नाबार्ड आणि प्रशिक्षण संस्था योग्य प्रकारे इतर भारतीय भाषांमध्ये रुपांतर करू शकतात. एपीएमएएस अशा प्रयत्नांना नक्कीच पाठिंबा देईल. ह्या पुस्तिकांचे मराठी भाषांतर करण्यासाठी बाएफ संस्था, पुणे आणि श्री. शिरीष जोशी, श्री. गिरीश जोशी, पुणे यांनी केलेल्या अथक प्रयत्नांबद्दल मनपूर्वक आभार! आपल्या अभिप्रायासाठी आम्ही खूप उत्सुक आहोत.

आपला

**सी. एस. रेड्डी**

मुख्य कार्यकारी अधिकारी

एपीएमएएस

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळासाठी स्वयंशिक्षण पुस्तिका संच कशासाठी? | ३ |
| ह्या पुस्तिकेसंबंधी | ६ |
| परिभाषा / लघुरूपे | ८ |
| सुरुवात करण्यापूर्वी | ११ |
| १. शेतकरी संस्थेमधील सदस्यांचे महत्त्व | १२ |
| २. सदस्यांची मालकी आणि नियंत्रण | १७ |
| ३. सभासदत्वाची प्रमुख वैशिष्ट्ये | २४ |
| ४. शेतकरी संस्थेमध्ये सदस्यत्व – कोणाला? कसे? | ३५ |
| ५. भांडवल उभारणीत सहभाग – सदस्यता ही मालकी आहे | ३७ |
| परिशिष्ट I: महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० | ४२ |
| परिशिष्ट II : कंपनी अधिनियम २०१३ नुसार सदस्यता तरतुदी | ४३ |
| स्वयंमूल्यमापन | ४६ |

# ह्या पुस्तिकेसंबंधी

## संचालकांसाठी अभ्यास पुस्तिका संच

१. शेतकरी संस्था : परिचय आणि गरज

२. शेतकरी संस्थेची संस्थात्मक बांधणी व रचना

**३. शेतकरी संस्थेचे सभासदत्व**

४. शेतकरी संस्थेमधील शासन

५. शेतकरी संस्थेचे व्यवस्थापन

६. शेतकरी संस्थेच्या कायदेशीरबाबींची पूर्तता

७. व्यवसाय योजना

८. लेखा आणि वित्त

९. कापणी नंतरचे मूल्य साखळी व्यवस्थापन

१०. विपणन

११. उत्पादकता वृद्धी सेवा

१२. नेतृत्व

**शेतकरी संस्थेचे सभासदत्व** ही शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळाच्या सदस्यांसाठी स्वयंशिक्षण पुस्तिकेच्या मालिकेतील तिसऱ्या क्रमांकाची पुस्तिका आहे. सदस्य शेतकरी संस्थेचे मालक असल्याने आणि शेतकरी संस्थेचा संपूर्ण हेतू सदस्यांची सेवा करणे हा आहे, त्यामुळे हा अभ्यासक्रम खूप महत्वाचा आहे.

## उद्देश

या पुस्तिकेचा हेतू शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळ सदस्यांना आवश्यक ज्ञान घेण्यास सक्षम बनविणे आहे जेणेकरून ते प्रभावीपणे आपली भूमिका बजावू शकतील आणि त्यांच्या शेतकरी संस्थांना चैतन्यपूर्ण आणि त्यांच्या सदस्यांसाठी उपयोगी बनण्यांस मदत करेल.

**लक्ष्य गट** : ही पुस्तिका शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळाच्या सदस्यांसाठी आहे. संचालक मंडळ सदस्यांना त्यांच्या शेतकरी संस्था चालविण्याचा किमान एक वर्षाचा अनुभव असावा.

## शिकण्याचे उद्दिष्ट

सदस्यत्वावरील ह्या अभ्यासक्रमाचे मुख्य उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

- सदस्यांचे महत्त्व, त्यांची मालकी आणि नियंत्रण यांचे कौतुक मिळविण्यासाठी
- शेतकरी संस्थेमध्ये सदस्यत्वाच्या वेगवेगळ्या प्रमुख वैशिष्ट्यांविषयी माहिती मिळवणे
- सदस्यत्वाचे निकष आणि सभासद भांडवलाच्या योगदानाची गरज समजून घेण्यासाठी

## रचना आणि सामग्री

ह्या अभ्यासक्रमाची सुरुवात सदस्यांचे महत्व, सदस्यांची मालकी आणि नियंत्रण ह्या बाबी हाताळते. मग ह्या अभ्यासक्रमामध्ये सदस्यत्वाची वेगवेगळी मुख्य वैशिष्ट्ये आणि सदस्यांच्या भांडवलाच्या योगदानाचे महत्त्व ह्या बद्दल अभ्यास केला गेला आहे.

## पुस्तिका कशी वापरावी ?

संचालक मंडळाचे सदस्य हा अभ्यास संच स्वतः वापरु शकतात किंवा बाहेरील व्यक्तींकडून शिकण्याची सोय करू शकतात. या संचांसोबत, योग्य त्या ठिकाणी या अभ्यास संचासंबंधित फलक आहेत जे संचालक मंडळाचे सदस्य, शिक्षणासाठी कामाच्या ठिकाणी प्रदर्शित करू शकतात.

आम्ही अपेक्षा व्यक्त करतो कि आपण या अभ्यासक्रमाच्या शिक्षणाचा आनंद घ्याल आणि आपल्या शेतकरी संस्थेचे अधिक प्रभावी आणि कार्यक्षम पद्धतीने व्यवस्थापन कराल.

# परिभाषा / लघुरूपे

**घटना (एओए)** : सहकारी संस्थेसाठीच्या नियमावली प्रमाणे शेतकरी उत्पादक कंपनीसाठी आर्टिकल्स ऑफ असोसिएशन (एओए) आहेत. ही घटना कंपनीच्या संचालनाचे नियम स्पष्ट करते आणि कंपनीचे उद्दीष्ट आणि हेतू साध्य करण्याचे मार्ग स्पष्ट करते.

संचालक मंडळाला घटना तयार करावी लागेल आणि त्यांला कंपनी रजिस्ट्रारकडून मान्यता घ्यावी लागेल. घटनेमध्ये दुरूस्ती केल्यास ती दुरुस्ती कंपनी रजिस्ट्रारकडून मंजूर करून घ्यावी लागेल.

**सक्रिय सदस्य** : जो सदस्य शेतकरी संस्थेच्या सदस्यत्वाच्या जबाबदारीचे आणि नियमावलीचे निकष पूर्ण करतो.

उदाहरणार्थ, दुग्धशाळा सहकारी संस्थेच्या अधिनियमांमध्ये असे सूचित केले की एखाद्या सदस्याने वर्षामध्ये १८० दिवसांच्या कालावधीत कमीतकमी १८० लिटर दुध पुरवठा करावा, तर केवळ हा निकष पूर्ण करणारे सदस्य सक्रिय सदस्य मानले जातील.

**बोर्ड / संचालक मंडळ (बीओडी)** : धोरणात्मक निर्णय घेण्याकरिता संचालक मंडळ ही शेतकरी संस्थेची प्रशासकीय समिती आहे. शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळाची स्थापना सर्वसाधारण सभा अर्थात शेतकरी संस्थेच्या सदस्यांद्वारे निवडलेल्या प्रतिनिधीद्वारे केली जाते.

**नियमावली** : नियमावली ही सहकारी संस्थेचे कार्य सक्षम करण्यासाठीचा नियमांचा एक संच आहे. प्रत्येक सहकारी संस्थेची स्वतःची नियमावली असते आणि सहकारी संस्थेची सर्व कामे त्या नियमावली च्या कक्षेत करावी लागतात.

संचालक मंडळाला घटना तयार करावी लागते आणि त्या नियमावलीला सहकार निबंधकांकडून मंजूरी घ्यावी लागते. नियमावलीत कोणतीही सुधारणा केवळ सर्वसाधारण सभेद्वारेच केली जाऊ शकते आणि सहकार निबंधकांकडून त्याला मंजुरी घ्यावी लागेल.

**सहकारी संस्था** : सहकारी कायद्यांतर्गत नोंदणीकृत शेतकरी संस्थेला (उदा. महाराष्ट्र सहकारी कायदा १९६०) सहकारी संस्था म्हणतात.

**मुख्य कार्यकारी अधिकारी / व्यवस्थापक / महाव्यवस्थापक** : प्रत्येक शेतकरी संस्थेकडे पूर्णवेळ मुख्य कार्यकारी अधिकारी (मुख्य कार्यकारी अधिकारी) किंवा हुद्दा कोणताही असो (व्यवस्थापक, महाव्यवस्थापक इ.) असणे आवश्यक आहे. मंडळाची सर्वसाधारण देखरेख, दिशानिर्देश आणि नियंत्रणासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी शेतकरी संस्थेच्या कामांचे व्यवस्थापन करतील आणि शेतकरी संस्थेच्या कामगिरीसाठी जबाबदार असतील.

**लाभांश** : लाभांश म्हणजे शेतकरी संस्थेच्या नफ्यातून ते त्यांच्या सदस्यांना वितरित केले जाते.

**एफपीओ (शेतकरी संस्था)** : शेतकरी संस्था ही एक नोंदणीकृत संस्था आहे जी तिच्या शेतकरी सदस्यांच्या मालकीची आणि नियंत्रणाखाली असते. शेतकरी संस्थेचा उद्देश तिच्या सदस्यांना आवश्यक सेवा देऊन त्यांच्या सामूहिक गरजा भागविणे हा आहे. शेतकरी संस्था शेती आणि संबंधित क्षेत्रात वेगवेगळ्या कामांमध्ये सहभागी होतात. शेतकरी संस्था ही औपचारिक संस्था असल्याने तिचे कार्यालय आणि त्याला पायाभूत सुविधा, कर्मचारी, यंत्रणा असणे आवश्यक आहे आणि संचालक मंडळाने ती संस्था नियंत्रित केली पाहिजे. या पुस्तिकेमध्ये एफपीओला शेतकरी संस्था असा शब्द वापरला आहे.

**असामान्य सर्वसाधारण सभा (ईजीएम)** : विशेष सर्वसाधारण सभा ही एजीएम व्यतिरिक्त घेतलेली एक सर्वसाधारण मंडळाची बैठक असते. शेतकरी संस्थेच्या कोणत्याही विशिष्ट / तातडीच्या विषयावर चर्चा करण्यासाठी, अचानक ठराव घेण्याकरिता, दोन एजीएमच्या दरम्यान ही आयोजित केली जाते.

**जनरल बॉडी (जीबी)** : शेतकरी संस्थेच्या सर्व सदस्यांना त्या शेतकरी संस्थेचे सर्वसाधारण मंडळ असे संबोधले जाते. शेतकरी संस्थेमध्ये सर्वसाधारण मंडळाला सर्वोच्च अधिकार असतात.

**सर्वसाधारण सभा** : शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळाची सर्वसाधारण बैठक.

| | | |
|---|---|---|
| **सभासद केंद्रीतता** | : | शेतकरी संस्थेच्या सेवा सदस्यांच्या गरजांसाठी कशा महत्त्वाच्या / संबंधित असतात जर शेतकरी संस्थेच्या सेवा सदस्यांच्या गरजेशी संबंधित असतील तर त्यांच्यासाठी शेतकरी संस्था महत्त्वपूर्ण आहे असे सदस्यांना वाटते. |
| **सदस्य** | : | सदस्य म्हणजे शेतकरी संस्थेनी संमती दिलेली एखादी व्यक्ती किंवा उत्पादक संस्था आणि अशा सभासदासाठी आवश्यक पात्रता असणारी असावी. शेतकरी संस्थेमध्ये केवळ त्यांच्या कार्य क्षेत्रातील पात्र शेतकरी किंवा उत्पादक संस्था (त्यांच्या अधिनियम / घटनेनुसार) सदस्य होऊ शकतात. |
| **सदस्यांचा सहभाग** | : | शेतकरी संस्थेने तिच्या सभासदांना तिच्या व्यवसायात सहभागी करून घेऊन सेवा देणे. |
| **उत्पादक कंपनी** | : | कंपनी कायदा २०१३ अंतर्गत नोंदणीकृत शेतकरी संस्थेला प्रोड्यूसर उत्पादक कंपनी म्हटले जाते. प्रॉड्यूसर कंपनी म्हणजेच कंपनी कायदा २०१३ च्या कलम ५८१ ब मध्ये निर्दिष्ट केलेल्या हेतूने आणि निर्दिष्ट उपक्रम करणारी बॉडी कॉर्पोरेट, जी निर्माते कंपनी म्हणून नोंदणीकृत असणारी संस्था होय. |
| **आश्रयदाता** | : | शेतकरी संस्थेच्या व्यवसाय कार्यात भाग घेऊन शेतकरी संस्थेने सदस्यांना देऊ केलेल्या सेवांचा वापर; |
| **सहभागविषयक खात्री देणारी प्रणाली** | : | पीजीएस–इंडिया (Participatory Guarantee System) ही गुणवत्तेविषयक खात्री देणारी प्रणाली आहे जी स्थानिक पातळीशी संबंधित आहे, भागधारकांच्या सहभागावर भर देते. |
| **भागभांडवल** | : | मालकी घेण्याकरिता भागधारक सदस्यांनी शेतकरी संस्थेमध्ये जमा केलेली रक्कम. |
| **रोखलेली किंमत** | : | रोखलेली किंमत म्हणजे कोणत्याही सदस्याने शेतकरी संस्थेला पुरविलेल्या वस्तूंसाठी देय आणि देय किंमतीचा भाग; आणि त्यानंतरच्या तारखेला देण्यासाठी शेतकरी संस्थेने रोखलेला असणे. |

# सुरुवात करण्यापूर्वी

आधीच्या विभागात दिलेल्या माहितीनुसार ही पुस्तिका शेतकरी संस्थेमधील सदस्यत्व या विषयावर चर्चा करते.

या विषयावरील काही मूलभूत प्रश्न खाली दिले आहेत. चला या प्रश्नांची स्वत: उत्तरे देऊया. या चाचणीचा उद्देश हा संबंधित प्रश्नांवरील आपल्या सध्याच्या आकलनाचे मूल्यांकन करणे आणि अशा प्रकारे याबद्दल अधिक जाणून घेणे हा आहे.

१. शेतकरी संस्थेचे मालक कोण आहेत?

-- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- --

-- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- --

-- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- --

-- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- --

२. शेतकरी संस्थेमध्ये कोण सदस्य होऊ शकतो?

-- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- --

-- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- --

-- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- --

-- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- --

३. सदस्य आणि शेतकरी संस्थेच्या दरम्यान कोणते व्यवहार होतात?

-- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- --

-- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- --


-- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- --

-- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- --

# १

# शेतकरी संस्थेमधील सदस्यांचे महत्त्व

## सत्र उद्देश



**शेतकरी संस्थेसाठी सदस्यांचे महत्त्व आणि सदस्यांसाठी काम करणे या बद्दल समजून घेणे**

### मुख्य आशय

१. सदस्य – महत्त्व
२. शेतकरी संस्थेबरोबर सदस्यांचे व्यवहार

### प्रस्तावना

पूर्वीच्या शेतकरी संस्थेची संस्थात्मक बांधणी आणि रचनाच्या अभ्यासक्रमामध्ये आपण नमूद केले आहे की सदस्य, संचालक मंडळ सदस्य आणि कर्मचारी हे शेतकरी संस्थेचे तीन प्रमुख कार्यघटक आहेत. आपण हे देखील पाहिले की सदस्य हा शेतकरी संस्थेचा पाया आहे. मंडळ आणि कर्मचारी सदस्यांच्या हितासाठी काम करतात. अशाप्रकारे ही पुस्तिका शेतकरी संस्थेच्या सर्वात महत्वाच्या पदाधिकाऱ्यांशी, म्हणजेच सदस्य ह्यांच्याशी संबंधित आहे.

या पुस्तिकेमध्ये आपण सदस्यांचे महत्त्व, त्यांची मालकी आणि नियंत्रण, शेतकरी संस्थेमधील सदस्यत्वाची प्रमुख वैशिष्ट्ये याबद्दल बोलणार आहोत, म्हणजे सदस्य जमा करणे, सदस्य पातळी आणि शेतकरी संस्था यांच्यात लाभवाटपासंबंधीचा समतोल आणि सदस्य संबंध.

आपण शेतकरी संस्थेसाठी सभासदांच्या आर्थिक भांडवलाचे महत्त्व याबद्दल चर्चा करू.

### १.१ शेतकरी संस्थेचे सदस्य

आपण आपल्या शेतकरी संस्थेत व्यवसायात येण्यापूर्वी हे समजून घेतले पाहिजे की आपण कोणत्या प्रकारचे व्यवसाय करणार आणि कोणासाठी शेतकरी संस्थेला काम करावे लागते आणि का?

**संस्थेचा प्रकार यावर अवलंबून असतो**

- ✻ व्यवसायाचा मालक कोण आहे ?
- ✻ व्यवसायाचे नियंत्रण कोण करते ?
- ✻ व्यवसाय सेवा कोण वापरतो ?
- ✻ नफा कोणाला मिळतो ?

**सदस्य आहेत**


- ✻ शेतकरी संस्थेचे मालक
- ✻ शेतकरी संस्थेच्या सेवा वापरणारे
- ✻ जे शेतकरी संस्था नियंत्रित करतात
- ✻ शेतकरी संस्थेच्या अस्तित्वाचे कारण


वैयक्तिक मालकीच्या व्यवसायात, एकच व्यक्ती व्यवसायाची मालक असते, व्यवसाय नियंत्रित करते, चालवते आणि लाभ / नफा मिळविते. भागीदारीमध्ये, दोन किंवा अधिक लोक मालक असतात, नियंत्रण ठेवतात, व्यवसाय चालवतात, व्यवसायाची कायदेशीर ओळख असते आणि त्यांच्या गुंतवणूकीच्या आधारावर तोटा आणि नफा वाटून घेतात. आपली शेतकरी संस्था भागीदारी व्यवसायाचा एक प्रकार आहे,

- ✻ आपल्याकडे अनेक मालक आहेत,
- ✻ आपण आपल्या सदस्यांना आवश्यक असलेल्या विविध वस्तू आणि सेवा प्रदान करतो,
- ✻ आपले सदस्य गुंतवणूकदार आहेत, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे
- ✻ सदस्य केवळ शेतकरी संस्थेचे मालकच नसतात तर शेतकरी संस्थेच्या सेवांचा वापर करणारे देखील असतात.

याचा अर्थ असा की आपले सदस्य आपल्या शेतकरी संस्थेच्या अस्तित्वाचा पाया आहे. अशा प्रकारे सदस्यांच्या आर्थिक आणि सामाजिक उन्नतीसाठी काम करण्यासाठी शेतकरी संस्था आहे.

**आपण मालक आहोत, आपण उपयोगकर्ते, आपण नियंत्रक आहोत, नफा / तोटा आपला आहे.**








**सदस्य कोण आहेत?**

अधिनियमांच्या अधीन राहून, ज्या व्यक्तीला एफपीओच्या सेवांचा उपयोग करण्याची इच्छा आहे, ती व्यक्ती सदस्यत्वाच्या जबाबदाऱ्या स्वीकारण्याची त्याची/तिची तयारी व्यक्त करू शकते आणि शेतकरी संस्थेच्या अधिनियामांमध्ये निर्दिष्ट केलेल्या अशा इतर अटी पूर्ण करणारी आणि तिने भाग भांडवल भरले आहे.

# सदस्य आणि शेतकरी संस्था दरम्यान व्यवहार

सदस्य आणि शेतकरी संस्थेमधील संबंध आणि व्यवहार खाली दर्शविले आहेत.

**आकृती १: सदस्य आणि शेतकरी संस्था दरम्यान व्यवहार**




वरील आकृतीमध्ये दर्शविल्याप्रमाणे, सदस्य भाग भांडवलात योगदान देऊन शेतकरी संस्थेचे मालक असतात आणि शेतकरी संस्थेद्वारे प्रदान केलेल्या सेवांचा वापर करतात. शेतकरी संस्थेचा उद्देश तिच्या सदस्यांना वेळेवर आणि कमी खर्चात आवश्यक सेवा प्रदान करणे आहे.

## २. शेतकरी संस्थेच्या व्यावसायिक व्यवहार्यतेसाठी सदस्यांचे महत्त्व

ऑटो रिक्षाचा व्यवसाय प्रवाशांशिवाय चालतो का?

ग्राहकांनी भाज्या खरेदी केल्याशिवाय भाजीपाला दुकानातील व्यवसाय चालेल का?

अशा सर्व प्रकरणांमधील उत्तर स्पष्ट नाही असे आहे.

अशा प्रकारे शेतकरी संस्थेचा व्यवसाय देखील सदस्यांशिवाय चालू शकत नाही कारण सदस्य स्वतः शेतकरी संस्थेचे ग्राहकही आहेत.

उदाहरणार्थ, आगामी कृषी हंगामासाठी शेतकरी संस्था त्यांच्या सदस्यांना १० क्विंटल बियाण्याची आवश्यकता असल्याचा अंदाज करते. शेतकरी संस्था कर्ज घेते आणि तिच्या सदस्यांना पुरवठा करण्यासाठी १० क्विंटल बियाणे खरेदी करते. जर सदस्यांनी प्रत्यक्षात फक्त २ क्विंटल बियाणे घेतले तर काय होईल?

म्हणून मालकीशिवाय कोणतीही संस्था नाही आणि ग्राहकांशिवाय कोणताही व्यवसाय नाही. म्हणजेच सदस्यांशिवाय शेतकरी संस्थेसाठी कोणताही व्यवसाय आणि उत्पन्न स्रोत नाही.

आणखी एक उदाहरण खाली दिले आहे.

कर्नाटक राज्यातील शिवपुरम तालुक्यामध्ये साधिकराथा शेतकरी संस्था कार्यरत आहे. शिवपुरम समूहातील मुख्य पीक तूरडाळ आहे. साधिकराथा शेतकरी संस्थेची तूरडाळ गिरणी उभारण्याची योजना आहे. गिरणीची आवश्यक क्षमता व व्यवसायासाठी सभासदांची संख्या खाली दिली आहे.

| नं | विशिष्ट | एकक (युनिट) | युनिट्सची संख्या |
|---|---|---|---|
| **सयंत्र तपशील** | | | |
| १ | गिरणीची वार्षिक क्षमता | क्विंटल | ९००० |
| **कच्चा माल तपशील** | | | |
| २ | सरासरी प्रति सभासद जमीन आकार | एकर | २ |
| ३ | सरासरी उत्पादकता | क्विंटल/एकर | ४ |
| ४ | प्रति सभासद एकूण उत्पादन | क्विंटल | ८ |
| ५ | सदस्यांनी शेतकरी संस्थेला देऊ केलेल्या उत्पन्नाची टक्केवारी | % | ७५% |
| ६ | सदस्याने पुरविलेल्या कच्च्या मालाचे प्रमाण | क्विंटल | ६ |
| ७ | क्षमतेचा पूर्ण उपयोग करण्यासाठी आवश्यक सदस्यांची संख्या | संख्या | १५०० |

वरील उदाहरणावरून हे स्पष्ट आहे की शेतकरी संस्थेकडून डाळ गिरणी चालू ठेवण्यासाठी १५०० सभासदांची आवश्यकता आहे.

आता आपल्याला साधिकराथा शेतकरी संस्थेच्या व्यवहार्यतेशी संबंधित खालील प्रश्नांचा विचार करण्याची गरज आहेः

शेतकरी संस्थेने १५०० सदस्य एकत्रित न केल्यास आणि केवळ काही सदस्य आवश्यक कच्चा माल पुरवित असल्यास काय परिणाम होतील?


गिरणी उभारल्यानंतर काही वर्षानंतर १५०० सदस्यांची जमवाजमव केल्यास परिणाम काय होतील?

वरील उदाहरणावरून हे स्पष्ट आहे की शेतकरी संस्थेच्या व्यवसायाच्या व्यवहार्यतेसाठी शेतकरी संस्थेमध्ये पुरेशी सदस्यता आणि सदस्यांचे संपूर्ण पाठबळ हे महत्वपूर्ण आहे. शेतकरी संस्थेच्या कोणत्याही व्यवसायाच्या व्यवहार्यतेसाठी प्रक्रिया केंद्रांचा आणि सदस्यांच्या पूर्ण क्षमतेचा उपयोग करणे आवश्यक आहे आणि त्यासाठी सभासदांना एकत्रित करायला हवे.

# २

# सदस्यांची मालकी आणि नियंत्रण

## सत्र उद्देश




**सदस्यांच्या मालकीची आणि नियंत्रणाची आवश्यकता याबद्दल जागरूकता आणणे**
**सदस्यांच्या जबाबदाऱ्या जाणून घेणे**

### मुख्य आशय


१. सदस्यांची मालकी आणि नियंत्रण
२. सदस्यांच्या जबाबदाऱ्या

आधीच्या सत्रांमधील शेतकरी संस्था आणि सदस्य यांचा अर्थ ह्यावरून हे ज्ञात होऊ शकते की शेतकरी संस्था सभासद आधारित संस्था असतात ज्यांच्यावर सदस्यांची मालकी आणि नियंत्रण असते. आता, सदस्य शेतकरी संस्थेवर मालकी कशी मिळवू शकतात आणि ती कशी नियंत्रित करतात ते पाहूया.


**सदस्य अशाप्रकारे मालकीचा वापर करतात**




**भागभांडवल भरणे**





**शेतकरी संस्थेच्या भांडवलासाठी योगदान**





**शेतकरी संस्थेच्या सेवांचा वापर करणे**


**सदस्य अशाप्रकारे नियंत्रणाचा वापर करतात**



**संचालक मंडळाची निवडणूक**



**बैठकांमध्ये मतदान**



**प्रमुख विषयांवर निर्णय घेणे**

सदस्य शेतकरी संस्थेची मालकी आणि नियंत्रण करू शकतात असे मार्ग खालीलप्रमाणे आहेत.

**सदस्य अशाप्रकारे मालकीचा वापर करतात**
- ✻ भाग भांडवल भरणे
- ✻ शेतकरी संस्थेच्या भांडवलासाठी योगदान
- ✻ शेतकरी संस्थेच्या सेवांचा वापर करणे

**सदस्य अशाप्रकारे नियंत्रणाचा वापर करतात**
- ✻ बैठकांमध्ये मतदान
- ✻ प्रमुख विषयांवर निर्णय घेणे
- ✻ संचालक मंडळाची निवडणूक

## स्वाध्याय:

पुढील दोन शेतकरी संस्थेमधल्या घटना पाहू आणि या शेतकरी संस्थेच्या कामकाजाच्या यशांची चर्चा करू या.

**शेतकरी संस्था १ :** या शेतकरी संस्थेच्या कार्यात्मक क्षेत्रावरील सर्व संभाव्य सदस्य पूर्ण अधिकृत भाग भांडवल (अधिनियामांमध्ये नमूद केल्यानुसार आणि निबंधकांनी मंजूर केलेले) देऊन शेतकरी संस्थेचे सदस्य बनले. शेतकरी संस्थेमार्फत सदस्य नियमित मासिक बचतही करतात. उत्पादन घेण्याच्या वेळी शेतकरी संस्थेने किंमतीच्या १०% कपात केली, जी व्यवसाय चक्र पूर्ण झाल्यावर आणि व्यवसाय करण्याच्या सर्व खर्चाचे समायोजन केल्यानंतर सदस्यांना परत देण्यात आली.

**शेतकरी संस्था २ :** या शेतकरी संस्थेमध्ये, केवळ काही शेतकरी, शेतकरी संस्थेमध्ये सामील झाले आणि सदस्यांनी अधिकृत भाग भांडवलाच्या केवळ लहान भागासाठी हातभार लावला. शेतकरी संस्थेमध्ये सदस्य बचत आणि रोखलेली किंमत ठेवण्याची पद्धत नाही.

खालील जागा वापरा आणि वरील शेतकरी संस्थेमध्ये सदस्यांचे किती प्रमाणात मालकी व नियंत्रण आहे हे लिहा.

| शेतकरी संस्था १ | शेतकरी संस्था २ |
|---|---|
| | |

## सदस्यांच्या जबाबदाऱ्या

शेतकरी संस्थेमध्ये सदस्यांना फक्त हक्कच असतात, त्याचबरोबर त्यांना काही जबाबदाऱ्याही पूर्ण करण्याची गरज असते. सदस्यांच्या जबाबदाऱ्या खाली दर्शविल्या आहेत.

**आकृती १ : सदस्यांच्या जबाबदाऱ्या**

**वचनबद्धता आणि वापर**

* सेवांबद्दल वचनबद्धता
* सेवांचा प्रत्यक्ष वापर

**मालकी आणि नियंत्रण**

* प्रमुख निर्णयांवर मतदान
* संचालक नामनिर्देशित करणे आणि निवडणे
* प्रमुख निर्णयांमध्ये भाग घेणे

**वित्त**

* भाग भांडवल
* बचत
* भांडवल पुरवठा









वर दर्शविल्याप्रमाणे, सदस्यांनी केवळ शब्द देऊ नये (उदाहरणार्थ आगामी कृषी हंगामासाठी १० क्विंटल बियाण्याची मागणी करणे) परंतु सेवांचा वापर पण करावा (शेतकरी संस्थेकडून प्रतिबद्ध १० क्विंटल बियाणे घेणे). सदस्यांना देखील सर्वसाधारण सभेत उपस्थित राहून निर्णय घेताना सक्रियपणे भाग घेण्याची आवश्यकता असते उदा. कोणत्या लेखापरीक्षकांची (ऑडिटरची) नेमणूक करायची. शेतकरी संस्थेच्या अर्थसहाय्यात वेगवेगळ्या स्वरूपात सदस्यांनी हातभार लावणे देखील खूप महत्वाचे आहे.



## स्वाध्याय १ : कमलापूर शेतकरी उत्पादक संस्था

रमण आणि श्यामू कमलापूर शेतकरी संस्थेमध्ये वेगवेगळ्या सेवांचा लाभ मिळवण्यासाठी भागभांडवल भरून सदस्य झाले. रमण यांनी शेतकरी संस्थेकडून आवश्यक त्या प्रमाणात बियाणे आणि खते खरेदी केली आणि शेतकरी संस्थेला २५ क्विंटल भाजीपाला पुरवठा केला. त्यांनी शेतकरी संस्थेकडून क्रेडिट आणि विमा देखील मिळवला. श्यामूने शेतकरी संस्थेला ५० क्विंटल भाजीपाला पुरवठा केला परंतु इतर सेवा वापरल्या नाहीत. दोघेही वार्षिक सर्वसाधारण सभेत (एजीएम) हजेरी लावतात आणि मतदान आणि निर्णय घेण्यात सक्रियपणे भाग घेतात. त्यांना शेतकरी संस्थेचा वार्षिक अहवाल देखील मिळतो. त्याच शेतकरी संस्थेमध्ये शांता २५ क्विंटल भाज्या पुरवते आणि इतर सर्व सेवांचा लाभ घेते. पण, ती वार्षिक सर्वसाधारण सभेला कधीच हजर राहत नाही. त्याचप्रमाणे बलैयांनी भाग भांडवल देऊन सदस्यत्व घेतले आहे. परंतु त्यांनी कधीही शेतकरी संस्थेच्या कोणत्याही सेवा वापरल्या नाहीत आणि वार्षिक सर्वसाधारण सभेमध्येही भाग घेतला नाही.

वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यापूर्वी शेतकरी संस्थेने बैठकीत भाग घेण्यासाठी व मत देण्यासाठी अपात्र सदस्यांची यादी तयार केली आहे. या यादीमध्ये श्री. बलैया आणि इतर काही सदस्यांची नावे आली. अपात्रतेची कारणे खालीलप्रमाणे आहेतः

१. सदस्यांनी शेतकरी संस्थेच्या सेवा वापरल्या नाहीत
२. सदस्यांनी शेतकरी संस्थेच्या कार्यात भाग घेतला नाही
३. दोन वर्षांपासून सदस्य वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये उपस्थित राहिले नाहीत

अलीकडील वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये, रमन आणि श्यामू यांनी इतर सदस्यांसह मतदानाचा हक्क वापरला आणि सेवांच्या वापराच्या आधारे सदस्यांना ४०% नफा देण्याचा निर्णय घेतला.

कृपया पुढील गोष्टींवर चर्चा करा:

१. वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये भाग घेण्यासाठी आणि मतदान करण्यास बलैया व इतर काही सदस्य का अपात्र ठरले?
२. शेतकरी संस्थेमध्ये कोण निर्णय घेत आहे?
३. वरील घटकाच्या आधारे सदस्य व शेतकरी संस्था यांच्यातील संबंधांची यादी करा?
४. बलैया अजूनही ४० % नफा मिळविण्यासाठी पात्र असतील काय?

## स्वाध्याय २:

शेतकरी संस्थेमध्ये सदस्यता स्थिती खाली दिल्या आहेत. दिलेल्या मोजपट्टीवर आपल्या शेतकरी संस्थेला मानांकन करू या. तसेच, जिथे मानांकन सरासरीपेक्षा कमी आहे त्या सदस्यांची स्थिती सुधारण्यासाठी कृती सूचित करू या.

खूप कमी (१) – कमी (२) – सरासरी (३) – उच्च (४) – खूप उच्च (५)

१. शेतकरी संस्थेच्या कार्यरत क्षेत्रामधील एकूण संभाव्य सदस्यांपैकी ८०% त्या शेतकरी संस्थेचे सदस्य म्हणून समाविष्ट आहेत.

मानांकन :______________________________

करावयाच्या कृती :______________________________

२. श्यामला रामपूर दुग्ध सहकारी संस्थेच्या सदस्या आहेत. त्या सोसायटीला दुधाचा पुरवठा करतात आणि सोसायटीच्या पशुवैद्यकीय सेवा देखील घेतात. तथापि, त्या कधीही सर्वसाधारण सभेच्या बैठकीला उपस्थित राहून मतदान करत नाही. सहकारी संस्थेची सदस्या म्हणून श्यामला यांना राहता येईल का?

मानांकन :______________________________

करावयाच्या कृती :______________________________

३. बलैया काजू खरेदी व प्रक्रिया करण्यात गुंतलेल्या सहकारी संस्थेचे सदस्य आहेत. तथापि बलैया स्वतःचे उत्पादित काजू आपल्या काजूच्या उत्पादन सहकारी संस्थेला कधीही पुरवत नाहीत. ते सहकारी सदस्य म्हणून राहू शकतात का?

मानांकन :______________________________

करावयाच्या कृती :______________________________

४. जया देवी रंगापूर दूध सहकारी संघाच्या सदस्या आहेत. त्या सोसायटीला नियमितपणे दुधाचा पुरवठा करतात, सोसायटीच्या विविध सेवांचा लाभ घेतात आणि सर्वसाधारण सभेच्या बैठकीला उपस्थित राहून मतदान आणि निर्णय घेण्यात भाग घेतात. सहकारी संस्थेच्या सदस्या म्हणून त्यांना राहता येईल का?

मानांकन :______________________________

करावयाच्या कृती :______________________________

५. दूध संघाच्या शेतकरी संस्थेच्या एकूण ६००० सदस्यांपैकी ५०% (म्हणजे ३०००) शीतकरण संयंत्राला १८० लिटरचा किमान निश्चित पुरवठा करतात.

मानांकन :______________________________

करावयाच्या कृती :______________________________

६. एका शेतकरी संस्थेमध्ये साधारणतः किमान ८०% सदस्य नियमितपणे सर्वसाधारण सभांना उपस्थित राहतात.

मानांकन :________________________________

करावयाच्या कृती :________________________________________________

७. दुसऱ्या शेतकरी संस्थेमध्ये साधारणपणे २०% मंडळ सदस्य निर्णय घेण्यात सक्रियपणे भाग घेतात.

मानांकन ________________________________

करावयाच्या कृती ________________________________________________

८. एक तृतीयांश सदस्य २ वर्षांच्या कालावधीत शेतकरी संस्थेच्या सदस्यत्वातून माघार घेतात.

मानांकन :________________________________

करावयाच्या कृती :________________________________________________

९. सदस्यांकडील मालाच्या मागणीच्या आधारे खतांच्या मागणीचा अंदाज घेतल्यानंतर शेतकरी संस्थेने मागणीनुसार खतांच्या १०० पिशव्या आणल्या. पण, प्रत्यक्षात सदस्यांनी १०० पिशव्यांपैकी केवळ ४० पिशव्या घेतल्या आहेत.

मानांकन :________________________________

करावयाच्या कृती :________________________________________________

१०. सलग तीन हंगामात दुग्धशाळेतील गुंतवणूकीसाठी एक एफपीओ शीतकरण केंद्रासाठी आवश्यक असलेल्या एकूण दुधाच्या ६०% दूध सदस्यांकडे आवश्यक प्रमाणात उपलब्ध असूनसुद्धा दूरदूरच्या ठिकाणाहून सदस्य नसलेल्या लोकांकडून आणत आहे.

मानांकन :________________________________

करावयाच्या कृती :________________________________________________

## स्वाध्याय ३:

वर चर्चा केलेल्या घटकांच्या आधारावर, कोणत्या मर्यादेपर्यंत आपली शेतकरी संस्था सदस्यांच्या मालकीच्या आहेत आणि त्यांच्याद्वारे नियंत्रित आहेत हे तपासूया?

-- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- --

-- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- --

-- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- --


-- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- --

-- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- -- --

# ३

# सभासदत्वाची प्रमुख वैशिष्ट्ये

## सत्र उद्देश



**शेतकरी संस्थेमध्ये सदस्यत्वाच्या वेगवेगळ्या प्रमुख वैशिष्ट्यांविषयी माहिती मिळवणे**

**मुख्य आशय**

१. सदस्य संख्या वाढवणे
२. सदस्य केंद्रीत
३. शेतकरी संस्था स्तरावर आणि सदस्य पातळीवर फायदा वाटपाचे संतुलन राखणे; अल्प मुदतीचे आणि दीर्घ मुदतीचे
४. सदस्यांमध्ये एकमेकांशी संबंध सुरक्षित राखणे

शेतकरी संस्थेमधील सदस्यांचे महत्त्व आणि सदस्यांची मालकी, नियंत्रण याबद्दल आपल्याला माहिती आहे, आता खालीलप्रमाणे सभासदांच्या वेगवेगळ्या मुख्य वैशिष्ट्यांमध्ये जाऊया.

✻ सदस्य संख्या वाढवणे

✻ सदस्य केंद्रीतता

✻ सभासद आणि शेतकरी संस्था यांच्यातील फायदा वाटपाचे संतुलन


✻ सदस्यांमध्ये एकमेकांशी संबंध सुरक्षित राखणे

आता या वैशिष्ट्यांकडे एक–एक करून पाहूया.

## ३.१ सदस्य संख्या वाढवणे

शेतकरी संस्थेच्या व्यवहार्यतेसाठी आणि टिकून राहण्यासाठी, सदस्य नोंदणी करणे आणि सदस्य शेतकरी संस्थेचे ग्राहक असल्याने आवश्यक सेवा देऊन त्यांची देखभाल करणे अत्यंत आवश्यक आहे. आपल्या शेतकरी संस्थेमधील सदस्यत्व असे असले पाहिजे की आपण त्यांची प्रभावीपणे सेवा करण्यास सक्षम असू आणि त्याचबरोबर शेतकरी संस्थेच्या कारभारामध्ये आणि व्यवस्थापनात सदस्यांचा प्रभावी सहभाग घेण्याची यंत्रणा आपल्याकडे असेल. खाली दर्शविल्याप्रमाणे शेतकरी संस्थेमध्ये सदस्यांची जमवाजमव तीन स्तरावर घडते.

**आकृती २ : सदस्यांची जमवाजमव**




✻ **नोंदलेला सदस्य –** शेतकरी संस्थेचे कार्य क्षेत्रातील सर्व संभाव्य सदस्य – सदस्यता पात्रतेच्या निकषानुसार – भांडवल एकत्रित करणे

✻ **सक्रिय सदस्य –** किमान सदस्यता सुरू ठेवण्याच्या निकषांची पूर्तता – सक्रिय सदस्य होण्यासाठी १००% – सदस्यत्व चालू ठेवणे

✻ **पूर्ण आश्रयदाता सदस्य –** आश्रय म्हणजेच सदस्यांद्वारे सर्व सेवांचा वापर – किमान सदस्यता सुरू ठेवण्याच्या निकषापेक्षा जास्त – सक्रियपणे बैठकांमध्ये भाग घेणे, मतदान करणे, निर्णय घेणे.

वर दर्शविल्याप्रमाणे, फक्त शेतकरी संस्थेमध्ये भागधारक म्हणून सदस्य नोंदणी करणे पुरेसे नाही. शेतकरी संस्थेच्या कामकाजासाठी सदस्य सक्रिय असले पाहिजेत म्हणजे त्यांच्या अधिनियमांमध्ये निर्देशित केल्याप्रमाणे शेतकरी संस्थेकडून किमान विहित सेवा घेणे (उदा. सहकारी दूध संघामध्ये एका वर्षात १८०

दिवसांत १८० लिटर दुध). तसेच शेतकरी संस्थेच्या शोशत कामकाजासाठी सदस्यांना निर्णय घेण्याच्या प्रक्रियेमध्ये आणि मतदानात सक्रियपणे भाग घेणे.

वरील तीन स्तरांवर सदस्यांना एकत्रित करणे ही संचालक मंडळ सदस्यांची प्रमुख जबाबदारी आहे. यासाठी संचालक मंडळाला सदस्यांकडून पूर्ण आश्रयदाता मिळवण्यासाठी किमान पातळीच्यावर सेवांची तरतूद, नियमित व योग्य सर्वसाधारण सभा, निवडणुका, निर्णय घेणे इत्यादी सुनिश्चित करणे आवश्यक आहे.

तसेच संचालक मंडळाला वेळोवेळी त्यांचे कर्मचारी किंवा सहाय्य संस्थेमार्फत आवश्यक सदस्य शिक्षण आयोजित करावे लागेल जेणेकरुन ते तिन्ही स्तरांवर एकत्रित होऊ शकतील.

### आत्मनिरीक्षण करण्यासाठी प्रश्न

१. तुमच्या कार्य क्षेत्रातील बहुतेक संभाव्य / पात्र शेतकरी तुमच्या शेतकरी संस्थेमध्ये सदस्य म्हणून सामील झाले आहेत का?

२. तुमच्या शेतकरी संस्थेमधील बहुसंख्य सदस्य सक्रीय सदस्य आहेत का?

३. सक्रिय सदस्य मापदंडाच्या पलीकडे आपले किती सदस्य आपल्या सेवांचा वापर करतात, आपल्या शेतकरी संस्थेच्या कार्यात सक्रियपणे भाग घेतात?

## ३.२ सदस्य केंद्रीतता

**चर्चेचा प्रश्न :** जर शेतकरी संस्था त्यांच्या सदस्यांना कायमच मर्यादित सेवा देऊ शकत असेल तर काय करावे? सदस्य शेतकरी संस्थेचे ग्राहक असल्याने इतर सेवा पुरवठादारांच्या तुलनेत शेतकरी संस्था त्यांच्या सदस्यांमध्ये अधिक मोठा खरेदीदार /विक्रीदार असणे आवश्यक आहे. उदा. सदस्यांकडून भुईमूग खरेदी करण्याची सेवा असलेल्या शेतकरी संस्थेला भागातील इतर कोणत्याही खरेदीदाराच्या तुलनेत जास्त खरेदी करावी लागते.

याचा अर्थ असा की जर एखादी शेतकरी संस्था सदस्यांच्या आवश्यकतेपैकी कमीतकमी ५०% (इतर कोणत्याही सेवादात्यांपेक्षा जास्त म्हणून) गरजा सुसंगत आणि दर्जेदार मार्गाने भागवत असेल तर आपण असे म्हणू शकतो की शेतकरी संस्थेच्या सदस्यांसाठी महत्वाचे आहे.

शेतकरी संस्थेच्या सेवा सदस्यांच्या गरजांसाठी कशा महत्त्वाच्या / संबंधित असतात हे सभासद केंद्रितता दर्शवते. म्हणजेच, जर शेतकरी संस्थेच्या सेवा सदस्यांच्या गरजेशी संबंधित असतील तर त्यांच्यासाठी शेतकरी संस्था महत्त्वपूर्ण आहे असे सदस्यांना वाटते .

## सदस्य केंद्रीततेचे उदाहरण:

अनंत शेतकरी संस्थेमध्ये भुईमूग हे सर्व सदस्यांसाठी प्रमुख पीक आहे. त्या शेतकरी संस्थेमधील सदस्याचे सरासरी तपशील खालीलप्रमाणे आहेत.

निविष्ठांची किंमत – रु. एकरी १२,००० (बियाणे, खते, कीटकनाशकांसह)

उत्पादन मूल्य – रु. २४,००० (एकरी ६ क्विंटल; किंमत ४००० प्रति क्विंटल)


एफपीओ कडून सेवांचे एकूण मूल्य – रू. एकर ३६,०००

एकूण निविष्ठांपैकी शेतकरी संस्थेकडून रु. ८००० (जे खत आणि बियाणे आहेत) घेतले जातात.

उत्पादनापैकी ४ क्विंटल शेतकरी संस्थेला विकले जातात – रु. १६,०००

अशा प्रकारे, शेतकरी संस्थेकडून घेतलेल्या सेवांचे एकूण मूल्य – रू. २४००० (रु. ८०००+ रु.१६,०००)

अशा प्रकारे, आवश्यक असणाऱ्या एकूण सेवांपैकी ६६% (३६,००० पैकी २४,००० रुपये) म्हणजे दोन तृतीयांश रक्कम शेतकरी संस्थेकडून घेतली जात आहे जी उच्च सदस्य केंद्रीतता आहे.



## स्वाध्याय २:

शेतकरी संस्थेमधील सदस्य केंद्रिततेची काही उदाहरणे खाली दिली आहेत. केंद्रीततेबद्दलच्या वरील चर्चेच्या आधारे संबंधित प्रत्येक उदाहरणात केंद्रीयता अस्तित्त्वात आहे की नाही याचे उत्तर देण्याची गरज आहे (होय / नाही) तसेच उत्तरासाठी स्पष्टीकरण देण्याची आवश्यकता आहे.

१. एक शेतकरी त्याच्या एकूण २.५ एकर जागेपैकी दोन एकरात कापूस पिकवतो आणि त्याच्या कुटुंबासाठी कापूस हा मुख्य उत्पन्नाचा स्त्रोत आहे. एक शेतकरी संस्था या क्षेत्रामध्ये कापसासाठी निविष्ठांचा पुरवठा, पत, खरेदी, मूल्यवर्धन आणि विपणनाचा व्यवसाय करत आहे. शेतकरी संस्थेमध्ये सदस्य म्हणून काम करण्यास शेतकऱ्याला रस असेल काय?

उत्तर: ______________________________

स्पष्टीकरण: ______________________________________________________________

______________________________________________________________

२. वरील प्रकरणात, उदाहरणार्थ, ५ वर्षांनंतर, जर सोयाबीन कापसापेक्षा उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत बनली, तर शेतकरी संस्थेने सोयाबीन पिकच्या आवश्यकतेसाठी त्यातील सेवा बदलल्या पाहिजेत का?

उत्तर: ______________________________

स्पष्टीकरण: ______________________________________________________________

______________________________________________________________

३. अन्य एका बाबतीत, परिसरातील बहुतांश शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत धान्य आहे तर दुभत्या जनावरांचे संगोपन फारच कमी आहे. तरीसुद्धा, त्या परिसरातील दुग्ध सहकारी संस्थांना प्रोत्साहन देण्याचा प्रस्ताव आहे. हा शेतकरी संस्थेच्या क्षेत्रातील सदस्यांसाठी केंद्रस्थानी असू शकतो?

उत्तर: ______________________________

स्पष्टीकरण: ______________________________________________________________

______________________________________________________________

## स्वाध्याय २:

पुढील पैलूंबद्दल आपल्या शेतकरी संस्थेच्या आपल्या सदस्यांसाठी असलेल्या सेवांचे मूल्यांकन करूया.

| क्र | तपशील | वर्तमान स्थिती |
|---|---|---|
| १ | सेवा दिल्या जाणाऱ्या सदस्यांची संख्या | |
| २ | सदस्यांना देण्यांत आलेल्या सेवांचे मूल्य | |
| २ | प्रति एकर निविष्ठांची पुरवठा किंमत | |
| ४ | प्रति एकर उत्पादन मूल्य | |
| ५ | सेवांचे एकूण मूल्य | |
| ६ | एकूण पैकी, शेतकरी संस्थेकडून घेतलेल्या निविष्ठांची किंमत | |
| ७ | उत्पादनापैकी शेतकरी संस्थेला विकल्या जाणाऱ्या क्विंटलची संख्या | |
| ८ | शेतकरी संस्थेकडून घेतलेल्या सेवांचे एकूण मूल्य | |
| ९ | शेतकरी संस्थेकडून घेतल्या जाणाऱ्या एकूण सेवांचा टक्केवारी | |
| १० | सदस्य केंद्रीतता (उच्च / कमी) | |

इतर सेवादात्यांचा तुलनेत आपली शेतकरी संस्था सदस्यांसाठी केंद्रस्थानी आहे की नाही याचे मूल्यांकन करूया. तसे नसल्यास, आपल्या शेतकरी संस्थेला आपल्या सदस्यांसाठी अधिक केंद्रस्थानी आणण्यासाठी कोणते कृती बिंदू असू शकतात?

## ३.३ सभासद आणि शेतकरी संस्था यांच्यातील फायदा वाटपाचे संतुलन

या विभागात, आपण सदस्य आणि शेतकरी संस्था यांच्यातील फायदा वाटपाचे संतुलन ही महत्त्वपूर्ण आवश्यकता पाहणार आहोत; अल्पकालीन आणि दीर्घकालीन शेतकरी संस्थेचा अंतिम हेतू तिच्या सदस्यांना लाभ मिळवून देणे हा आहे, परंतु शेतकरी संस्था स्तरावर देखील आवश्यक फायदे निश्चित करणे महत्वाचे आहे. शेतकरी संस्थेसाठी कोणताही फायदा नाही – शेतकरी संस्था चालू शकत नाही – आवश्यक सेवा प्रदान करू शकत नाही – त्यामुळे सदस्यांनाही फायदा होणार नाही.

आता दोन वेगवेगळ्या शेतकरी संस्थेच्या खालील दोन परिस्थितींवर एक नजर टाकूया.

**शेतकरी संस्था १ :** शेतकरी संस्था तिच्या सदस्यांकडून भाजीपाला खरेदी करते आणि कॉर्पोरेट खरेदीदारांना विकते. सदस्यांना ही सेवा देण्यासाठी शेतकरी संस्थेला गुंतवणूक (संग्रह केंद्र, वाहतूक वाहन), कर्मचारी इ. खर्च आलेला आहे. तथापि, शेतकरी संस्थेचे संचालक मंडळ, सदस्यांच्या सर्व दर्जेदार उत्पादनांसाठी बाजारपेठेच्या किंमतीपेक्षा खूप जास्त किंमत देते. यामुळे शेतकरी संस्थेचे नुकसान झाले आहे आणि गुंतवणूकीचा खर्च आणि खेळत्या भांडवलाचा खर्च पण मिळालेला नाही.

**शेतकरी संस्था २ :** ही शेतकरी संस्थादेखील त्याच सेवेमध्ये गुंतलेला आहे आणि त्याच खर्चासह. तथापि, ही शेतकरी संस्था सदस्यांना बाजारपेठेनुसार तीन वेगवेगळ्या दर्ज्यांसाठी आणि वजन, कमिशन, वाहतूक आणि प्रतीक्षा कालावधीच्या योग्य अटींनुसार बाजारपेठेतील भावानुसार योग्य किंमत देतात. हे पाहता, सदस्यांना दीर्घ मुदतीमध्ये फायदा होतो आणि शेतकरी संस्थेला हा व्यवहार किफायतशीर ठरतो ज्यामुळे ती त्याची किंमत भरून काढू शकतो आणि सदस्यांची सेवा अधिक चांगल्या प्रकारे करतो.

कृपया खालील जागा वापरा आणि वरील दोन परिस्थितीवर परिणाम लिहा:


| शेतकरी संस्था १ | शेतकरी संस्था २ |
|---|---|
| | |

विश्लेषणावरून हे स्पष्ट दिसून येते की कोणत्याही सेवेचा केवळ सदस्य स्तरावरच नव्हे तर शेतकरी संस्था स्तरावरही फायदा व्हायला हवा. असा कोणताही प्रकार होऊ नये ज्याचा फायदा फक्त सदस्यांनाच होईल परंतु शेतकरी संस्थेला नाही किंवा केवळ शेतकरी संस्थेलाच होईल आणि सदस्यांना नाही. सदस्य स्तरावरील आणि शेतकरी संस्था स्तरावर होणाऱ्या लाभामध्ये संतुलन राखणे हे संचालक मंडळाचे महत्त्वपूर्ण कर्तव्य आहे. यासंदर्भात संचालक मंडळाला आवश्यक सदस्य शिक्षण करावे लागेल.

आता, सदस्यांच्या आणि शेतकरी संस्थेच्या अपेक्षांमधील विरोधाभास आणि शेतकरी संस्थेच्या व्यावसायिक व्यवहार्यतेची इतर उदाहरणे पाहूया.


| सेवा | सदस्यांच्या अपेक्षा | शेतकरी संस्थेची व्यवहार्यता |
|---|---|---|
| खतांचा पुरवठा | कमी किंमत, घरपोच वितरण | खत व्यवसायात कमी लाभ |
| कृषी यंत्रे | दीर्घ कालावधीसाठी आणि जास्त कामाची आवश्यकता | यंत्राच्या घसाऱ्यात वाढ , उच्च कार्य आणि देखभाल खर्च |
| भाजीपाला खरेदी | निकृष्ट दर्जासाठी उच्च किंमत; त्वरित पैसे मिळणे | गुणवत्ता बिघडण्याचा धोका, बाजाराचा धोका |

वरील उदाहरणांवरून हे लक्षात येते की कधीकधी सदस्यांच्या अपेक्षांमध्ये आणि शेतकरी संस्थेच्या व्यवहार्यतेमध्ये संघर्ष असू शकतो. इतर कोणत्याही सेवादात्यांचा तुलनेत जर सदस्यांची अपेक्षा खूपच जास्त असेल तर त्याचा परिणाम शेतकरी संस्थेसाठी खूप जास्त खर्चिक होतो, शेतकरी संस्था उत्पन्न मिळवून खर्च भागवू शकत नाही आणि त्यामुळे त्या सेवा टिकवून ठेवू शकत नाही. म्हणून, सदस्यांच्या अपेक्षा आणि शेतकरी संस्था व्यवहार्यतेचा समतोल राखणे हे संचालक मंडळाच्या सदस्यांचे मुख्य कर्तव्य आहे.



## अल्प मुदतीच्या आणि दीर्घ मुदतीच्या फायद्यांमध्ये समतोल राखणे

अल्प मुदतीच्या आणि दीर्घ मुदतीच्या फायद्यांमध्ये संतुलन साधून सदस्य एकत्र करणे देखील खूप महत्वाचे आहे. अल्पावधीच्या फायद्यांमध्ये सुद्धा काही प्रतिस्पर्धी तात्पुरते आकर्षण देऊन सदस्यांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करू शकतात, शेतकरी संस्थेमध्ये सदस्य होऊन त्यांना दीर्घ मुदतीच्या फायद्यांविषयी सुद्धा शिक्षित करणे महत्वाचे आहे.



उदाहरणार्थ, एक शेतकरी संस्था सदस्यांकडून टोमॅटोची खरेदी करते आणि उत्पादन बाजारपेठेत विक्रीस आणते. तीच्या सदस्यांना तातडीने अधिक फायदा होण्याच्या उद्देशाने शेतकरी संस्था १० रुपये प्रति किलो देते जेव्हा त्याच गुणवत्तेचा बाजारभाव दर किलोसाठी ५ रुपये असतो. या परिस्थितीत सदस्य केवळ अल्प मुदतीच्या फायद्यासाठी आकर्षित झाले आहेत, शेतकरी संस्थेला प्रती किलो १० रुपयांपेक्षा जास्त किंमतीला विक्री करता येत नाही, त्यामुळे नुकसान होते आणि सदस्यांना खरेदी सेवा देता येत नाही.

संचालक मंडळाला शेतकरी संस्था स्तरावर व्यवहार्यतेच्या आवश्यकतेबद्दल आवश्यक ते शिक्षण घेणे आवश्यक आहे कारण ही त्यांची संस्था आहे. व्यवहार्यतेमुळे शेतकरी संस्थेमध्ये अधिक गुंतवणूक होते आणि अशा प्रकारे दर्जेदार सेवा देता येते ज्यामुळे सदस्यांचा दीर्घकाळ फायदा होतो. अन्यथा, सदस्यांना अल्प कालावधीसाठी लाभ मिळू शकेल परंतु शेतकरी संस्था टिकावू होणार नाही आणि अशा प्रकारे सदस्यांना सेवा देणे चालू ठेवू शकणार नाही परिणामी सदस्यांना कोणताही फायदा होणार नाही.

## ३.४ सदस्य संबंध

सदस्य शेतकरी संस्थेचे मालक आणि ग्राहक असल्याने व्यवसाय व्यवहार्यतेसाठी आणि शेतकरी संस्थेची निरंतरता टिकवण्यासाठी त्यांच्याशी संबंध राखणे महत्वाचे आहे. सदस्य संबंधांचे विविध मार्ग खाली दर्शविले आहेत.

**आकृती ३ : सदस्य संबंधांचे मार्ग**


| | |
|---|---|
| **माहिती आणि संपर्क** | ✻ पत्रके<br>✻ वार्षिक अहवाल<br>✻ माहिती केंद्र |
| **अभिप्राय** | ✻ सेवांवर<br>✻ तक्रार निवारण |
| **सुविधा** | ✻ शेतकरी संस्थेच्या कार्यालयात<br>✻ संग्रह केंद्र, पुरवठा (इनपुट), वितरण केंद्र यासारख्या सदस्यांची परस्पर संवाद क्षेत्रे |
| **सेवा वितरण** | ✻ गुणवत्ता सेवा, वेळेत<br>✻ उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सदस्यांना प्रोत्साहन / पुरस्कार |
| **ओळख आवश्यक** | ✻ वेळोवेळी बदलत्या गरजा |
| **सदस्य शिक्षण** | ✻ प्रशिक्षण<br>✻ शैक्षणिक भेट<br>✻ जागरुकता सभा |

वर दर्शविल्याप्रमाणे, शेतकरी संस्थेच्या वेगवेगळ्या मार्गांनी त्यांच्या सदस्यांशी संबंध राखू शकतात. सदस्य शिक्षण, माहिती देणे हे या संदर्भात अतिशय प्रभावी आहे. सेवा, गरजा, गुणवत्ता इत्यादी संदर्भात नियमित अभिप्राय घेणे आवश्यक आहे जेणेकरून वेळोवेळी सुधारणा करणे शक्य होईल. सदस्यांसाठी आवश्यक सुविधांची खात्री करणे देखील महत्वाचे आहे, उदा. – शौचालय, पिण्याचे पाणी, आसन इ.

## तक्रार निवारण यंत्रणा

सदस्याशी संबंधित कोणत्याही तक्रारींचे पद्धतशीरपणे आणि वेळेवर निराकरण करणे आवश्यक आहे. शेतकरी संस्था तक्रारींचे निवारण करण्यासाठी मंडळाच्या सदस्यांची नेमणूक करेल. प्रशासकीय, आर्थिक इत्यादींच्या तक्रारींच्या प्रकारानुसार ते एक किंवा अनेक समित्या नियुक्त करु शकतात.


- समितीचे व संपर्क व्यक्तीचे नाव सूचना फलकावर व पत्रकावर स्पष्टपणे दर्शविले जावे ;
- संबोधित करण्याची प्रक्रिया आणि अंदाजे लागणारा वेळ हे देखील दर्शविले जावे ;
- सर्व तक्रारी तोंडी / लेखी स्वरूपात व्यक्तीचे नाव, तक्रारीचे प्रकार इ. सह स्पष्टपणे नमूद केल्या पाहिजेत.
- नजीकच्या मंडळाच्या बैठकीत विषयपत्रिकेच्या आधारे हा विषय उपस्थित केला पाहिजे आणि त्याकडे लक्ष दिले पाहिजे ;
- हा विषय समजून घेण्यासाठी व स्पष्टीकरण देण्यासाठी समिती सदस्यांनी व्यक्तिशः भेटणे आवश्यक आहे ;
- बैठकीच्या इतिवृत्त पुस्तकात लेखी आणि विधिवत दस्तऐवजीकरणाद्वारे निर्णयाची माहिती देण्यात यावी ; आणि
- न्यायालयीन प्रकरण असल्यास कायदेशीर सल्ल्याच्या मदतीने हे प्रकरण जवळच्या न्यायालयात नेण्यात यावे.



# ४

# शेतकरी संस्थेमध्ये सदस्यत्व – कोणाला? कसे?

## सत्र उद्देश



**शेतकरी संस्थेमध्ये सदस्यत्वाचे निकष समजून घेणे**

**शेतकरी संस्थेमध्ये सदस्यत्व मिळविण्याच्या पद्धती समजून घेणे**

### मुख्य आशय

१. सदस्य प्रवेश

२. सदस्यता रद्द करणे

३. सदस्यता समाप्ती

आपल्या शेतकरी संस्थेच्या घटनेमध्ये, सदस्यांच्या पात्रता आणि अपात्रतेनुसार सदस्यांची नावे नोंदवण्याची जबाबदारी शेतकरी संस्थेची असते.

**सदस्यत्व मिळविण्याची प्रक्रिया**

* शेतकरी संस्थेमध्ये सदस्यत्व घेण्यास इच्छुक व्यक्ती शेतकरी संस्थेच्या सेक्रेटरी यांच्याकडे अर्ज सादर करतात, नंतर सचिव मुख्य कार्यकारी अधिकारी त्या अर्जांचा विचार करण्यासाठी संचालक मंडळापुढे ठेवतात.
* अर्ज केल्यापासून ३० दिवसांच्या आंत संचालक मंडळाचा निर्णय कारणांसह अर्जदारांना कळविण्यात येतो.
* अर्जदार प्रवेश शुल्क म्हणून रु. ______________अक्षरी (रु. _______________ फक्त) आणि भाग भांडवल म्हणून रु.______________ अक्षरी (रुपये ____________________ फक्त) आणि प्रवेशाच्या वेळी लागू असलेले इतर शुल्क भरतो / ते.

✻ शेतकरी संस्थेच्या सदस्याने भरलेल्या भागभांडवलासाठी सभासदांना पावती व प्रमाणपत्र जारी करते आणि सदस्यतेची नोंद अद्ययावत करते.

या प्रकरणात संचालक मंडळाचा निर्णय अंतिम आणि कायदा, घटना आणि व्यवसाय व प्रशासनाच्या नियमांच्या तरतुदींच्या अधीन असतो.

## सदस्यत्व समाप्त करणे


कोणत्या परिस्थितीत सदस्यता समाप्त बंद केली जाईल?

✻ सदस्यत्व मागे घेतल्यावर, शेतकरी संस्थेच्या संचालक मंडळाच्या मान्यतेनंतर.

✻ शेतकरी संस्थेचे अधिनियम / व्यवसाय नियमात नमूद केलेली कोणतीही अपात्रता आढळून आल्यावर

✻ शेतकरी संस्थेने दिलेल्या कोणत्याही व्यवहारात किंवा सेवेमध्ये सदस्याने एका वर्षासाठी भाग घेतला नाही


✻ शेतकरी संस्थेच्या हितसंबंधासाठी हानिकारक उपक्रम राबविल्यामुळे सदस्यत्व काढून टाकल्यावर अशा प्रकारच्या सदस्यतेच्या समाप्तीनंतर शेतकरी संस्था सदस्याचे खाते शेतकरी संस्थेच्या नियमांनुसार बंद केले जाईल.



# ५

# भांडवल उभारणीत सहभाग – सदस्यता ही मालकी आहे

## सत्र उद्देश



**शेतकरी संस्थेमध्ये भागभांडवलाची आवश्यकता समजून घेण्यासाठी**

**शेतकरी संस्थेमध्ये सदस्यांच्या आर्थिक भांडवलाच्या गुंतवणुकीची गरज समजून घेणे**


### मुख्य आशय

१. शेतकरी संस्थेसाठी भागभांडवल

२. शेतकरी संस्थेमध्ये सदस्यांच्या मोठ्या प्रमाणात आर्थिक भागीदारीचे महत्त्व

## प्रस्तावना

आधीच्या सत्रामध्ये आपण पाहिले आहे की शेतकरी संस्थेच्या भांडवलासाठी सदस्यांचे योगदान ही शेतकरी संस्थेमध्ये मालकी कायम ठेवण्याचा मुख्य मार्ग आहे. जर शेतकरी संस्था खरोखर सदस्यांच्या मालकीची संस्था बनायची असेल आणि ती निरंतर चालायची असेल तर त्यासाठी तिच्या सदस्यांकडून भांडवल जमा करून घेणे आवश्यक आहे. या सत्रात आपण सदस्यांचे हे सर्वात महत्वाचे कार्य पाहणार आहोत.




### चर्चेचे प्रश्न:

१. शेतकरी संस्थेचा व्यवसाय सुरू करण्यासाठी निधीचे स्रोत कोणते आहेत?

२. भागभांडवल म्हणजे काय?

शेतकरी संस्थेच्या व्यवसायासाठी भांडवलाची आवश्यकता असते आणि ते तीन मुख्य स्त्रोतांमधून भांडवल तयार करू शकतात:

a. सदस्य–मालकांच्या भागभांडवलातून

b. व्यवसायातून निर्माण झालेल्या फायद्यातील राखीव निधीपासून

c. अनुदान किंवा कर्जाच्या स्वरूपात बाहेरील लोकांकडून

सदस्यांनी उभारलेल्या भाग भांडवलाचे दोन उपयोग असतात. सदस्य रोखे खरेदी करून शेतकरी संस्थेला पुरेसे भांडवल उपलब्ध करून आधार देतात आणि त्यांच्यात मालकीची भावना निर्माण करतात.

सदस्य भागभांडवल शेतकरी संस्थेसाठी वैयक्तिक सदस्य वचनबद्धतेचे प्रतिनिधित्व करते. हे प्रत्येक सदस्याने आर्थिक काय पणाला लावले आहे याचे देखील प्रतीक आहे. जेव्हा सदस्य शेतकरी संस्था सोडेल तेव्हाच ते मागे घेतले जाते.

## शेतकरी संस्था त्यांच्या सदस्यांकडून भागभांडवल का गोळा करतात?

भागभांडवल ही मालकीच्या नाण्याची एक बाजू आहे आणि तिच्या सेवांचा लाभ ही दुसरी बाजू आहे. मालक त्यांच्या भागभांडवल गुंतवणूकीतून व्यवसायासाठी समर्थन देतात आणि त्या बदल्यात सहकारी सदस्य–मालकांना फायदे देतात. सदस्यासाठी सर्वात महत्वाचा फायदा म्हणजे शेतकरी संस्थेचे अस्तित्व होय. लोक शेतकरी संस्थेमध्ये गुंतवणूक करतात कारण त्यांना या सेवा वापरायच्या असतात. याव्यतिरिक्त, सदस्यांना समुदायाचा भाग असल्याचा, शेतकरी संस्थेच्या उद्दिष्टांना समर्थन दिल्याचा तसेच ज्या समुदायामध्ये ते सेवा घेतात, या सगळ्यांचा लाभ मिळतो.

## चर्चेचा प्रश्न : कोणत्या प्रकारचा निधी सर्वोत्तम आहे?

शेतकरी संस्था समुदाय–आधारित व्यवसाय असल्याचा फायदा दर्शविते, जेथे खूप लोकांकडून तुलनेने दरडोई अल्प प्रमाणात गुंतवणूकीचा निधी उपलब्ध होऊ शकतो, मोठ्या प्रमाणात भांडवल मिळवणे शक्य आहे. सदस्यांना विकलेल्या समभागातूर मर्यादित पैसे जमा होतात आणि ते जमा होण्यास वेळ लागू शकतो. (विशेषत: अशा शेतकरी संस्थेसाठी ज्यांना व्यवसायाचा विस्तार करायचा आहे.)

शेअर गुंतवणूक, बँका आणि इतर देणेकऱ्यांसाठी सदस्य–मालकांची वचनबद्धता दर्शवते. तथापि, भांडवलाचा प्रकार आणि स्त्रोत महत्त्वपूर्ण आहे कारण त्यावर संबंधित नियम व अटी अवलंबून असतात.

## केस स्टडी

धारणी शेतकरी संस्था कमलापूर तालुक्यामधील शेतकऱ्यांसमवेत कार्यरत आहे. ही सहकारी कायद्यांतर्गत नोंदणीकृत आहे. ज्या शेतकऱ्यांना या सेवेचा उपयोग करायचा आहे आणि जे शेतकरी संस्थेने निश्चित केलेल्या अधिनियमांच्या तरतुदी आणि इतर अटींचे पालन करण्यास इच्छुक आहेत त्यांनी प्रवेशशुल्क, भागभांडवल भरले आहे आणि सदस्य बनले आहेत. शेतकरी संस्थेच्या सदस्यांकडून आणि इतरांकडूनही उत्पादन विकत घेते. तथापि, शेतकरी संस्था तिच्या व्यवसायाच्या नियमांनुसार, सदस्य नसलेल्यांकडून एकूण खरेदीच्या २०% पेक्षा जास्त खरेदी होत नाही याची खात्री करते.

शेतकरी संस्थेला हे समजले आहे की समभाग खरेदी करणे मर्यादित आणि संथ आहे, म्हणूनच, शेतकरी संस्था बँका व इतर विकास संस्थांकडून त्यांचे कामकाज अधिक गतिमान करण्यासाठी कर्ज गोळा करीत आहे.

तीन वर्षांपासून, शेतकरी संस्थेच्या सर्वसाधारण मंडळाने प्रत्येक सदस्याने शेतकरी संस्थेद्वारे केलेल्या व्यवहारावर आधारित लाभातील ४०% रक्कम देण्याचे ठरविले. सदस्यांचे म्हणणे आहे की आम्ही आमच्या सहकारी संस्थेवर विशास ठेवतो; त्यांना त्यांच्या खरेदीतून अत्यधिक नफा मिळत नाही कारण व्यवहाराच्या प्रमाणात अतिरिक्त रक्कम परत केली जाते. शेतकरी संस्थेच्या मंडळाचे म्हणणे आहे की ते परताव्यांकडे लक्ष देतात कारण अशा परताव्यामुळे संस्थेवर निव्वळ उत्पन्न मिळविण्यासाठी योग्य दबाव निर्माण होऊ शकतो, जे निरोगी व्यवसायाचे लक्षण आहे.

**खालील जागा वापरा आणि सदस्यांकडून भागभांडवल जमा करण्याच्या फायद्यावर विचार करा.**

## सदस्य आर्थिक भांडवल

आता आपण खालील दोन शेतकरी संस्थांकडे पाहू आणि सदस्यांचे भागभांडवल, मालकी आणि शेतकरी संस्थेची निरंतरता यांच्यातील संबंधाचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न करू:

**शेतकरी संस्था १ :** या शेतकरी संस्थेचे कार्यरत क्षेत्रावरील सर्व संभाव्य सदस्य पूर्ण अधिकृत भागभांडवल देऊन शेतकरी संस्थेचे सदस्य बनले. शेतकरी संस्थेमार्फत सदस्य नियमित मासिक बचतही करतात. शेतीतील उपकरणे आणि संबंधित खर्चासाठी शेतकरी संस्था सदस्यांकडून ठेवी एकत्र करून सदस्यास कर्ज पुरवते आणि आवश्यक असल्यास सदस्य त्यांच्या ठेवीच्या रकमेवर १० पट कर्जाची सुविधा मिळवू शकतात. उत्पादन विकत घेण्याच्या वेळी शेतकरी संस्थेने किंमतीच्या १०% कपात केली जी व्यवसाय चक्र पूर्ण झाल्यावर सदस्यांना परत देण्यात आली.

**शेतकरी संस्था २ :** दुसऱ्या शेतकरी संस्थेमध्ये, शेतकरी शेतकरी संस्थेमध्ये सामील झाले आणि सदस्यांनी अधिकृत भाग भांडवलाच्या फक्त थोड्या भागास हातभार लावला. शेतकरी संस्था आपल्या सदस्यांना कोणतीही बचत आणि कर्ज सेवा देत नाही. शेतकरी संस्था चालू व्याजदरावर विकास वित्तीय संस्थांकडून कर्ज घेते. तथापि, शेतकरी संस्था व्यवसायासाठी ते पुरेसे नाही. म्हणूनच, पाठबळ देऊ करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेने शेतकरी संस्थेला व्याजमुक्त कर्ज दिले. शेतकरी संस्था स्तरावर निधीच्या योग्य व्यवस्थापनासाठी वित्तीय संस्थांनी शेतकरी संस्थेला मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची नेमणूक करण्यास सुचविले. शेतकरी संस्थेचे आर्थिक स्थैर्य टिकवण्यासाठी अर्थसाहाय्य देणारी संस्था शेतकरी संस्थेच्या कर्मचाऱ्यांचा पगार देते.

सदस्यांच्या आर्थिक भांडवलाच्या दृष्टीने दोन शेतकरी संस्थेच्या स्थितीचे आणि सदस्यांची मालकी, नियंत्रण आणि संस्थांच्या टिकाऊपणावर होणाऱ्या परिणामाचे विश्लेषण करा. खालील जागा वापरा आणि आपली निरीक्षणे लिहा:


| शेतकरी संस्था १ | शेतकरी संस्था २ |
|---|---|
| | |

वरील प्रकरणांमधून हे लक्षात येऊ शकते की शेतकरी संस्थेची मालकी आणि निरंतरता निश्चित करण्यासाठी सदस्यांचे अंतर्गत आर्थिक भांडवल खूप महत्त्वपूर्ण आहे. किमान अंतर्गत भांडवलाशिवाय बाह्य भांडवल मिळवणे शक्य नाही. पुरेशा अंतर्गत भांडवलाशिवाय, अंतर्गत मालकी मिळणार नाही आणि अशा शेतकरी संस्था बहुतेक बाह्य संस्थांद्वारे नियंत्रित असतात.

जर पुरेसे सदस्य आर्थिक भागभांडवल असेल तर शेतकरी संस्थेच्या निर्णयामध्ये आणि इतर कामांमध्ये सदस्यांची मालकीची भावना आणि सक्रिय सहभाग दिसू शकेल.

शेतकरी संस्थेमध्ये सदस्यांची आर्थिक भागीदारी खालीलप्रकारे असते.

* भागभांडवल
* ठेवी
* कर्ज
* भांडवलात योगदान बचत
* रोखलेली किंमत



## परिशिष्ट । : महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०

**(१९६१ मधील महाराष्ट्र कायदा क्रमांक २४)**

१९. सदस्यता वगैरेच्या प्रवेशासाठी पाळल्या जाणाऱ्या अटी – कोणत्याही व्यक्तीस संस्थेचा सदस्य म्हणून प्रवेश दिला जाईल जर–

**I.** त्यांनी सोसायटीने नमूद केलेल्या फॉर्ममध्ये किंवा कुलसचिव यांनी नमूद केलेल्या फॉर्ममध्ये, सदस्यत्वासाठी अर्ज केल्यास;

**II.** त्याच्या अर्जास त्या समितीने प्रदान केलेल्या अधिकारांच्या अनुषंगाने समितीने मान्यता दिली आहे आणि सदस्यांच्या सर्वसाधारण समितीने त्यांच्यावतीने त्यास दिलेल्या अधिकारांच्या अनुषंगाने अशा ठरावाला अधीन केले जाऊ शकते जे वेळोवेळी आणि नाममात्र किंवा सहयोगी सदस्याच्या बाबतीत समितीच्या वतीने अधिकृत सोसायटीच्या अधिकाऱ्या द्वारे;

**III.** त्याने अधिनियम, नियम आणि पोट–कायद्यांतील इतर सर्व अटी पूर्ण केल्या आहेत;

**IV.** संस्था, संस्था किंवा संस्था कॉर्पोरेट, सोसायटी जर रजिस्ट्रेशन ऍक्ट, १८६० अंतर्गत नोंदणीकृत सोसायटीच्या बाबतीत, सार्वजनिक विशस्त किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या नोंदणी संदर्भात कोणत्याही कायद्यानुसार नोंदणीकृत पब्लिक ट्रस्ट सदस्यासाठी अशा सभासदत्वासाठी अर्ज करण्याच्या निर्णयासह ठराव देखील असतो.

**१९ ए. कलम २३ (१ ए) अंतर्गत सदस्यतेसाठी निबंधकाकडे निविदा अर्ज करण्याची प्रक्रिया–**

(१) जेथे एखाद्या सोसायटीने पात्र व्यक्तीकडून सदस्यता घेण्यासाठी अर्ज करण्यास नकार दर्शविला असेल तर अशा व्यक्तीने 'EM -1' मधील निबंधकांकडे आवश्यक पैशांचा भाग आणि प्रवेश फीसह निवेदन पाठवावे.

(२) निबंधक अशा अर्जाची पावती मिळाल्यानंतर संबंधित सोसायटीला ती मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत आवश्यक पैशांचा आणि प्रवेश फीसह पाठवेल.

(३) सोसायटी निर्णय घेईल आणि उप–नियम (२) मध्ये प्रदान केलेल्या अशा अर्जाच्या तारखेपासून साठ दिवसांच्या आत अर्जदारास ती कळवेल आणि अर्जदाराला त्या कालावधीत कोणताही निर्णय सांगितला नसेल तर. अर्जदारास साठ दिवसांनंतर अशा सोसायटीचा सदस्य म्हणून मान्यता देण्यात येईल.

(४) जर सोसायटीने अर्जदाराला त्याचा सदस्य म्हणून नाकारण्यास नकार दिला असेल तर तो उप–नियम (३) मध्ये नमूद केलेल्या साठ दिवसांच्या कालावधीत निर्णय घेऊन त्याकारणास्तव आवश्यक पैशांचा भाग आणि प्रवेश फीसह परत करेल. जर सोसायटी ही रक्कम परत करण्यास अपयशी ठरली तर अशा संपर्काच्या तारखेपासून त्या रकमेवर वार्षिक १५% व्याजदेय असेल आणि जर ती भरली गेली नसेल तर जमीन महसूल थकबाकी म्हणून वसूल केली जाईल.

# परिशिष्ट II: कंपनी अधिनियम २०१३ नुसार सदस्यता तरतुदी

## सभासदांचे हक्क

जेव्हा एखादी व्यक्ती सदस्य बनते/बनतो, ती /तो कायद्याच्या तरतुदीनुसार सदस्य होण्याचे समाप्त होईपर्यंत, ती/ तो सदस्याचे सर्व हक्क वापरण्यास पात्र आहे. सदस्याचे हक्क असेः

- त्याचे समभाग हस्तांतरित करण्यासाठी ;
- कंपनीच्या बैठकीत ठरावावर मतदान करणे ;
- कंपनीच्या एका विशेष सर्वसाधारण सभेची मागणी करणे किंवा संयुक्त करणे ;
- सर्वसाधारण सभेची नोटीस प्राप्त करणे ;
- सर्वसाधारण सभेत उपस्थित राहणे व बोलणे ;
- बैठकीत प्रस्तावित केलेल्या ठरावांमध्ये दुरुस्ती करणे ;
- जर सभासद हा कॉर्पोरेट संस्था असेल तर सर्वसाधारण सभांमध्ये उपस्थित राहण्यासाठी व मतदान करण्यासाठी प्रतिनिधींची नेमणूक करणे ;
- कंपनीला त्याचे ठराव प्रसारित करायला लावणे ;
- लाभांश वाटून कंपनीच्या नफ्याचा लाभ घेणे ;
- संचालकांची निवड करणे आणि त्यांच्यामार्फत कंपनीच्या व्यवस्थापनात भाग घेणे ;
- काही वाद निर्माण झाल्यास कंपनी लॉ बोर्डाकडे अर्ज करणे ;
- गैरव्यवस्थेच्या बाबतीत मदत मिळावी म्हणून कंपनी लॉ बोर्डाकडे अर्ज करणे ;
- कंपनीचे समापन करण्यासाठी न्यायालयात अर्ज करणे ;
- समापन करतांना अधिशेषात भाग घेणे ; आणि
- त्याच्या समभागांबाबत त्याला समभाग प्रमाणपत्र मिळणे.

## सदस्याचे मतदानाचे हक्क

a) जर सदस्यत्व केवळ एका स्वतंत्र व्यक्तीकडे असेल तर, मतदानाचा हक्क प्रत्येक सभासदाच्या / तिचा हिस्सा किंवा उत्पादक कंपनीला दिलेला आश्रय विचारात न घेता, एका मतदानावर आधारित असेल.

b) त्यांच्या आश्रयाच्या आधारे प्रत्येक आर्थिक वर्षाच्या शेवटी कोणत्याही सक्रिय सभासदाला अतिरिक्त मतांचे वाटप केले जाणार नाही.

c) जिथे सदस्याता केवळ उत्पादक संस्थांचीच बनलेली आहे अशा बाबतीत, तिथे मागील वर्षात संबंधित संस्थांद्वारे कंपनीच्या व्यवसायिक व्यवहारात सहभागाच्या आधारे मतदानाच्या हक्कांची गणना केली जाऊ शकते. नोंदणीच्या पहिल्या वर्षासाठी मतदानाचा हक्क भागधारणेच्या आधारे निश्चित केला जाईल.

d) जिथे सदस्याता, सदस्य आणि उत्पादक संस्थाी यांनी बनलेली आहे, तिथे मतदानाचे हक्क प्रत्येक सदस्याच्या एकाच मताच्या आधारे मोजले जातील.

e) प्रत्येक सक्रिय सदस्यास कमाल एक मत असावे. पण नव्याने प्रवेश घेतलेल्या सदस्यांकडे कमीतकमी सहा महिने (किंवा मंडळाने निर्दिष्ट केलेल्या मुदतीसाठी) कोणतेही मतदानाचे हक्क असणार नाहीत.

## सदस्यत्व समाप्त होणे

पुढील परिस्थितीत, सदस्यत्व ताब्यात घेतले जाते:

- तिचे/त्याचे शेअर्स हस्तांतरित करून बदलीच्या बाबतीत, हस्तांतरण झालेल्याच्या नावावर शेअर्सची नोंद होईपर्यंत हस्तांतरित करणारी व्यक्ती सदस्यच राहील;
- त्याचे / तिचे शेअर्स जप्त करून;
- वैध पद्धतीने समभाग परत देऊन;
- मृत्यूने, परंतु शेअर्स संक्रमित होईपर्यंत तिची/त्याची मालमत्ता कोणत्याही समभागांवरच्या देय पैशासाठी उपयोगात आणली जाईल;
- कंपनीने घटनेच्या हक्काचा उपयोग करुन तिचे समभाग विकले आहेत;
- कोर्टाच्या आदेशाद्वारे किंवा कोणत्याही अन्य सक्षम प्राधिकरणाने टाच आणली असेल किंवा दाव्याच्या समाधानासाठी समभाग ताब्यात घेणे व त्यांची विक्री करणे;

* अधिकृत मुखत्यारने दिवाळखोर झाल्यामुळे त्याचे समभाग अस्वीकृत केल्याने;
* चूक किंवा मुद्दामहून दिलेल्या चुकीच्या माहितीमुळे सदस्यता रद्द केली असेल.

**हितसंबंधांचा संघर्ष**

* एक व्यक्ती जिचे व्यवसायिक हितसंबंध उत्पादक कंपनीच्या व्यवसायाशी संबंधित विरोधात आहेत अशी कोणतीही व्यक्ती त्या कंपनीचा सदस्य होऊ शकत नाही.
* उत्पादक कंपनीच्या व्यवसायाशी विरोधात असलेले कोणतेही हितसंबंध तयार झालेला एखादा सदस्य, त्या कंपनीचा सदस्य राहणार नाही आणि नियमाप्रमाणे त्याला सदस्य म्हणून काढून टाकले जाईल.



# स्वयंमूल्यमापन

कृपया हे आठवा की अभ्यासक्रमाच्या सुरूवातीस आपल्याकडे काही माहिती होती ज्यामध्ये आपण शेतकरी संस्थेमध्ये सदस्यत्व घेण्याच्या काही मूलभूत प्रश्नांची उत्तरे दिली होती.

आता आपण वरील विषयाच्या पुस्तिकेच्या शेवटच्या टप्प्यावर आलो आहोत.

या शेवटच्या टप्याचा उद्देश असा आहे की वरील पुस्तिकेमुळे झालेल्या ज्ञानासंदर्भात स्वत:चे मूल्यांकन करणे

तर आपण अभ्यासक्रमावरील आपल्या शिक्षणावर आधारित आणखी काही प्रश्नांची उत्तरे देऊ

**१. शेतकरी संस्थेचे सक्रिय सदस्य कोण?**

**२. शेतकरी संस्थेच्या सेवांचा वापर हे सदस्यांचे सर्वात महत्वाचे कार्य कसे आहे?**

**३. सदस्य एकत्रित करण्याचे विविध स्तर काय आहेत?**

**४. शेतकरी संस्थेमध्ये सदस्य केंद्रीतता कशी टिकवायची?**

**५. सदस्यांच्या आणि शेतकरी संस्था यांच्यामधील लाभाचे संतुलन तुम्ही कसे कराल?**


# पुस्तिकेतील प्रमुख कृती बिंदू

## शेतकरी संस्थेचे सभासदत्व

शेतकरी संस्थेचे सभासदत्व या पुस्तिकेमधून आपल्या शेतकरी संस्थेसाठी मुख्य कृती बिंदू काय असू शकतात ते लिहावे.

## टिपणे

# सदस्य आणि शेतकरी संस्थेमधील अंतर्गत हस्तांतरण



## एपीएमएएसबाबत

एपीएमएएस ही एक ना नफा ना तोटा या तत्वावर चालणारी राष्ट्रीय स्तरावरील स्त्रोत संस्था आहे महिला बचत गट (एसएचजी) आणि त्यांच्या संघटना, सहकारी संस्था, शेतकरी संस्था (एफपीओ) आणि इतर समुदाय आधारित संस्था (सीबीओ) ज्यांचा आत्मनिर्भर, परस्पर सहकार्य, स्वयं शिस्त अशा मार्गदर्शक मुल्यांवर ज्यांचा विश्वास आहे अशांच्या सबलीकरणासाठी एपीएमएएस कार्यरत आहे.







## विनिमय - शेतकरी संस्थेचे सभासदत्व

शेतकरी संस्थांना प्रोत्साहन आणि साहाय्य करणाऱ्या संस्थांना शाश्वत उद्योग विकसित आणि मार्गदर्शन करण्यासाठी एपीएमएएसने शेतकरी संस्था साहाय्य केंद्र स्थापन केले आहे. या संस्था बळकट करण्यासाठी लागणारी ध्येय-धोरणे, प्रशासन-व्यवस्थापन क्षमता वाढवणे यासारख्या विविध सेवा उपलब्ध करून देत आहे. त्याचबरोबरही संस्था शेतकरी संस्थांना व्यवसाय नियोजन, आर्थिक दुवे, विपणन विकसित करण्यासाठी तांत्रिक साहाय्य उपलब्ध करून देते.


साहाय्य

DGRV

द्वारा प्रकाशित

BAIF

apmas